**ग्रंथसंस्कृती जोपासना अभियानाकरीता आकस्मिकता निधी अग्रिम मंजूर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग,**
**शुध्दीपत्रक क्रमांक - योजना-१०११/प्र.क्र.-७६/२०११/भाषा-३.**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : २० डिसेंबर, २०११.**

**वाचा :-** १) वित्त विभाग, ज्ञापन क्रमांक-आकनि-२०.११/२७/अर्थसंकल्प-१४, दिनांक २८/११/२०११.
२) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय समक्रमांक, दिनांक २८ नोव्हेंबर, २०११.

**शासन शुध्दिपत्रक :-**

संदर्भ क्रमांक २ मधील शासन निर्णयातील परिच्छेद-१ मध्ये सुधारणा करण्यात येत असून सदर परिच्छेद खालीलप्रमाणे वाचावा :-

"या शासन निर्णयाद्वारे ग्रंथोत्सव २०११ हा उपक्रम राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या ३३ जिल्हा माहिती अधिकारी तसेच उपसंचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली व महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी गोवा यांच्यामार्फत डिसेंबर, २०११ मध्ये राबविण्यासाठी आकस्मिकता निधी अग्रीमाद्वारे मंजूर करण्यांत आलेला रु. ३५.०० लक्ष (रुपये पस्तीस लक्ष फक्त) इतका निधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या कार्यालयास संक्षिप्त देयकाद्वारे आहरीत करण्यास खालील अटींच्या अधीन राहून **एक विशेष बाब** म्हणून शासन मान्यता देण्यांत येत आहे. सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी सदर निधी संबंधित जिल्हा माहिती अधिकारी व उपसंचालक यांना प्रत्येकी रु. १.०० लक्ष (रुपये एक लक्ष फक्त) याप्रमाणे तात्काळ वितरीत करावा."

( संगणक संकेतांक क्र. २०१२१२२१०१६३४०२६८३३ )

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( ललिता शि. देठे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. सचिव, मराठी भाषा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
३. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
४. संचालक / उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (१० प्रती).
५. सर्व संबंधित जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई.

७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई.
११. वित्त विभाग (व्यय-४/विनियम/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१४), मंत्रालय, मुंबई.
१२. सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई.
१३. अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. संचालक, भाषा संचालनालय, मुंबई.
१५. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
१६. प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.
१७. उपसंचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली.
१८. उपसंचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी, गोवा.
१९. **भाषा - ३ (संग्रहार्थ)**